ISSN–2278-5655

AMIERJ Peer Reviewed Journal

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–X, Issues– V* *Sep – Oct 2021*

# महागड्या शिक्षण व्यवस्थेचे विध्यार्थी व पालकां समोरील आव्हाने

***Dr. Prashant R. Kamble***

*S.N.D.T. College of Arts & S.C.B. College of comm. & S. C. B. for womens charchget, Mumbai.*

**सारांश :**

समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण हे महत्वपूर्ण घटक आहे. शिक्षण समाजासाठी आवश्यक उर्जा, शक्ती, उत्पादन क्षमता, इ. संरक्षित करते. शिक्षणामुळे आपण आपल्या आजूबाजूच्या वातावरणाला समजू शकतो. तसेच समाजातील समस्या प्रती जागरूकता निर्माण होते.समाजात होणाऱ्या परिवर्तनसोबत शिक्षण व्यवस्थेतही परिवर्तन घडून येते. काळाच्या ओघात समाजात बदल घडून येत असतात त्याचबरोबर शिक्षण व्यवस्थेतही बदल होत असतो . भारतीय शिक्षण पद्धती प्राचीन काळापासून तर आता पर्यन्त सतत बदलत आली आहे. कोणत्याही मानवी समाजाच्या विकासाच्या प्रक्रियेत शिक्षण व्यवस्थेचे स्थान महत्वाचे असते समाजात अस्तीत्वात असलेली शिक्षण व्यवस्था व्यक्तीच्या सर्व समावेशक विकासाठी आवश्यक असते. परंतु आज भारतात शिक्षण क्षेत्रात बरीच असमानता आणि विषमता आढळून येते. शिक्षणाचे खाजगीकरण झाल्यामुळे शिक्षण शुल्कात अवाढव्य वाढ होऊन गरीब विध्यर्थ्यांना शिक्षण घेणे कठीण झाले .

**Key Words:** व्यक्तीच्या सर्व समावेशक विकास, शिक्षणाचे खाजगीकरण, महागडे शिक्षण, शैक्षणिक असमानता, स्वाय्यत तत्वावर शैक्षणिक संस्था

**प्रस्तावना :**

शिक्षण व्यक्तिगत स्वरुपात आपणास पूर्णता प्रदान करते. व्यक्तीला जागृत करून समाजाला आणि व्यक्तीला जागृत करते. मनुष्याचे जीवन तसेच समाजाच्या परीवर्तनासाठी शिक्षणाचे योगदान असाधारण आहे. आणि हे समाजाचे अभिन्न अंग आहे. हा असा आरसा असतो कि ज्यामध्ये समाजाचे चित्र प्रतिबिंबित होते. आपण पाहतो कि शिक्षणाच्या महान सहयोगाने मानवाने उधोग, विज्ञान-तंत्रज्ञान, शास्त्र इ . मध्ये क्रांती करून त्यांचे पुनर्निर्माण केले आहे. आर्थिक विकासातील गुणात्मक प्रगती सुशिक्षित व्यक्तीमुळेच झाली आहे. शिक्षणामुळे कामगार आपल्या अधिकारांप्रती जागृत होत आहे आणि सामाजिक स्वातंत्र्याचा अर्थ समजायला लागला आहे. परंतु वरील सर्व बाबी देशाच्या एका बाजूचे चित्र आहे ज्याला आपण इंडिया म्हणतो दुसरी बाजु तितकीच अंधकारमय, निरक्षरतेने ग्रासलेली, दारिद्र्याने भरडलेली कर्मकांड आणि अंधश्रद्धेने भरकटलेली,जातीयवाद नव्या रुपात पुढे आलेला ज्याला आपण भारत म्हणतो. जे हि नवीन सरकार येईल त्यांच्या विचारानुसार शैक्षणिक पद्धतीत बदल होतो. ज्या बदलामुळे विद्यार्थ्यांचे किती प्रमाणात गुणात्मक विकास घडून येईल याचीही शहानिशा केलेली वाटत नाही.

स्वातंत्र्याच्या ६५ वर्षानंतर सुद्धा भारतीय शिक्षणात अभिप्रेत असलेला दर्जा दिसून येत नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आलेल्या एका सर्वेमध्ये प्रथम क्रमवारीच्या संदर्भात २५० विधापिठात भारतातील एका विधापिठाचा १०० च्या पलीकडे नंबर लागतो यावरून आपल्या देशातील शैक्षणिक दर्जा आपल्या लक्षात येतो . देशाचा भौगोलिक आणि लोकसंख्येचा विचार करता प्रशासन आर्थिक संसाधनाच्या कमतरतेचे कारण सांगून लाखो विध्यार्थ्यांचा भार स्वतंत्र शैक्षणिक संस्थेकडे देऊन जबाबदारी झटकून टाकत आहे. याचा परिणाम १५-२० वर्षात काय झाला हे सर्वांना माहित आहेच.

संविधानाने प्रत्येकच व्यक्तीला मानवाधिकार बहाल केला आहे. याद्वारे "जिवंत राहण्याचा अधिकार" यांस अग्रक्रम दिला आहे. परंतु पशु, पक्षी,जनावरे जिवंत राहतात मानवाला सुद्धा गुलामासारखे जीवन जगणे यांवर बरीच चर्चा होऊन निष्पन्न निघाले ते म्हणजे फक्त जिवंत राहणे हा मानवाधिकार नव्हे तर मानवी प्रतीष्ठसह जीवन जगणे म्हणजे जिवंत राहणे हे होय. असे जीवन हे शिक्षणामुळे मिळते म्हणून २१ (अ ) कलम नुसार राज्य हे सहा ते चौदा वर्षापर्यंतच्या बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण राज्याने निर्देशित केलेल्या कायद्याप्रमाणे व ठरविल्याप्रमाणे प्रदान करते.

**अध्यनाची उद्दिष्टे:**

1) सध्यास्थितीचा शिक्षण क्षेत्राचा आढावा घेणे .

2) प्राथमिक पासून तर उच्च शिक्षणपर्यंत च्या अभ्यास शुल्काचा आढवा घेणे.

3) शिक्षणाच्या खाजगी कारणाचा परिणामाचा अभ्यास करणे.

**अध्यनाचे गृहीते :**

1) शिक्षणाला बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले.

2) खाजगी शिक्षण संस्थेचा उद्देश सामाजिक नसून भांडवली आहे.

3) शैक्षणिक संधीची असमानता

**अध्ययन संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिंबध हा व्दितीय स्त्रोतावर आधारित आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, लेख, तज्ञांची मते, Internet, इत्यांदी व्दितीय स्त्रोतांचा उपयोग केला असून आशय विश्लेषणोचे तंत्र वापरून त्या आधारे सविस्तर मांडणी केलेली आहे

**शैक्षणिक असमानता :**

भारतीय घटनेच्या ४५ व्या कलमानुसार देशातील १४ वर्षापर्यंतच्या सर्व मुलामुलींना १९६० पर्यंत सक्तीचे व मोफत शिक्षण उपलब्ध्द करावे असे निर्देश होते परंतु इ .स. २००० पर्यंत हे आश्वासन पूर्ण झालेले नाही. त्या आधी १९५७,१९८०,१९९०,१९९५ वायदे देण्यात आले होते. परंतु या वायद्याचे काय झाले असेल हे देशातील बालकांची शैक्षणिक स्थिती पाहून माहिती पडते. याला जबाबदार वरिष्ठ अधिकारी, उदासीन राज्यकर्ते यांच्यामुळे हे वायदे डावलण्यात आले आता २०१५ चा सुद्धा वायदा जाहीर झाला परंतु हाही वायदा पायदळी तुडविला जाईल देशात आज जवळपास ४० कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली जगत आहे. भयाण भीषण दारिद्र्य आणि अज्ञान इत्यादी करणाने गोरगरीब, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक समाजातील लोक आपल्या पाल्यांना शाळेत पाठविण्याऐवजी सोबत कामावर घेऊन जातात मुख्य म्हणजे ८५ % बालमजूर ग्रामीण भागात दिसतात.

भारत सरकरने आपल्या वेगवेगळ्या अहवालात, आदेशात शिक्षणाच्या समान संधीचा पुरस्कार केला आहे परंतु देशातील ग्रामीण भागातील तसेच मागासवर्गासाठी एक दिवास्वप्नच ठरले. हा समाज दिवसेंदिवस दरवर्षी अतिवेगाने वाढत आहे आणि मराठी किंवा प्रादेशिक भाषेच्या माध्यमाच्या शाळा दिवसेंदिवस बंद पडत आहे. दर्जेदार शिक्षणापासून गोरगरिबांचे मुले वंचित आहे कारण इंग्रजी माध्यमाच्या श्रीमंत शाळांची भरमसाठ लाखाच्या पुढे असलेली फी, देणग्या गरिबांच्या आवाक्याबाहेर आहे. स्वातंत्र्य पूर्व काळात श्रीमंतासाठी वेगळ्या व गरिबांसाठी वेगळ्या शाळा होत्या हा जो प्रकार आहे तो स्वातंत्राच्या ६५ वर्षानंतर हि अबाधितपणे चालू आहे. आज शासनाने फी माफ केली, शिष्यवृत्तीची सोय केली तरीही विध्यर्थ्यांच्या संपूर्ण खर्चाचा प्रश्न सुटत नाही. देशात प्राथमिक शाळेची गळती आणि दर्जा शैक्षणिक सुधारण्यासाठी सर्व शिक्षा अभियान राबविले याची काय अवस्था झाली आपणास माहित आहे केंद्र सरकारने मिड डे मिल सारख्या योजना आणल्या त्या सुद्धा भ्रष्ट अधिकारी आणि काही मंत्री यांच्या करामतीमुळे निकृस्ठ दर्जाचे अन्न शाळेतील बालकांना देण्यात येतात याची प्रचीती वेळोवेळी वर्तमान पत्रे आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया मधून दिसते .

**शिक्षणाचे व्यापारीकरण :**

आज भारतात प्रामुख्याने महाराष्ट्रत, आंध्र प्रदेशात, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ या पांच राज्यासोबत इतरही राज्यात खाजगी विधापिठे, कॉलेजेस, शाळा मोठ्या प्रमाणावर उदयास आलेले दिसतात याला जबाबदार सरकारी नीती. या नीतीनुसार शैक्षणिक खर्च सरकारला परवडत नसल्यामुळे देशातील संस्थांनी स्वाय्यत तत्वावर शैक्षणिक संस्था निर्माण करून चालविणे या धोरणात शासन कोणत्याही प्रकारचे अनुदान शिक्षक आणि इतर कार्मच्यारांचे वेतन आणि खर्च शासन करणार नाही त्या-त्या संस्थेने आपला खर्च उचलावा खाजगी शैक्षणिक संस्था शासनाच्या विध्यापिठाच्या सलग्न राहून अभ्यासक्रमास मान्यता देऊन पदवी प्रदान करेल इतकेच असेल आणि म्हणून अशा धोरणामुळे खाजगी संस्थांचे चांगलेच फावले उधोगाप्रमाणे नफा कमाविण्यासाठी ज्या बाबी करता येतील त्या बाबी खाजगी संस्थाचालक करू लागले. प्रथम संस्थेतील कार्मच्यारांची आर्थिक पिळवणूक दुसरी बाब म्हणजे मान्यता मिळालेल्या अभ्यासक्रमांची विध्यार्थ्यांकडून भरमसाठ फी घेणे उदा. इजि., मेडिकल, व्यवस्थापनशास्त्र , अशा विविध प्रोफेशनल कोर्सेस, त्याचबरोबर शिष्यवृत्ती धारकांकडून शिष्यवृत्ती काढून घेणे अशा विविध युक्त्या करून शिक्षणाचे व्यापारीकरण होऊ लागले यामध्ये जास्तीत जास्त राजकीय लोकांचा सहभाग होता. हळू-हळू यांची उलाढालपाहून बाकी धनदांडग्या लोकांना सुद्धा हा धंधा आवडायला लागला हि दुकानदारी इतकी फोफावली कि त्यांना आता ग्राहक मिळणे सुद्धा कठीण झाले. उदा. घेतल्यास महारास्ट्र राज्यात या वर्षी जवळपास ३५००० हजार इंजीनिअरिंगच्या जागा रिक्त होत्या तीच अवस्था फार्मसी, बीएड ,डीएड ,पोलीटेक्निक ,एम बी ए , इत्यादींची त्याचबरोबर यांच्या स्पर्धेमुळे शिक्षणाचा दर्जा सुद्धा खालावला आहे. कुठे आवश्यक सुविधा नाही, प्रशिक्षित प्राध्यापक नाही. जेव्हा सर्व स्तरावर शिक्षक, कर्मचारी जितके अद्यावत व कार्यक्षम तितके शिक्षण प्रभावी होईल. जोपर्यंत शिक्षकाला आपले व आपल्या कुटुंबाचे पालनपोषण निट करता येईल इतका मोबदला मिळत नाही तोपर्यंत त्याला अध्यावतता प्राप्त करून घेण्यासाठी स्वास्थ मिळणार नाही . तेव्हा शिक्षकाला पुरेसे स्वास्थ मिळण्यासाठी पुरेसे वेतन मिळाले पाहिजे.

आज कॉलेज पातळीपासून तर विध्यापिठात शिक्षण घेणाऱ्या विध्यार्थ्यांना प्रवेशापासून पासून तर परीक्षेचा फॉर्म भरणे, पुनर्मूल्यांकनासाठी ,तसेच ज्या सुविधा कॉलेजमध्ये नाही त्याचे सुद्धा पैसे आधीच प्रवेशाच्या वेळस उकळले जातात. यावरून मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट सुरु आहे असे वाटते. अशाप्रकारे शुल्क आकारून ताळमेळ न बसलेला पैसा वसूल करणे म्हणजेच शिक्षणाचे व्यापारीकरणच आहे असे वाटते शिक्षण खात्याचा कारभार उत्पन्न व खर्चाच्या ताळेबंदीच्या आधारावर चालविला जात आहे. नुकतेच कोठे समाजाच्या निम्न स्तरातील विध्यार्थी, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेत आणि महाविध्यालयात प्रवेश घेत आहे. शिकत आहे.

**भारतातील गरीब, मागासवर्गाचे शैक्षणिक वास्तव :**

भारत देश हा इ.स.२०२०-२५ पर्यंत जगातील एक आर्थिक महासत्ता होईल असे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विश्लेषक आणि भारतीय राजकीय नेते सांगतात.देशात जागतिकीकरण आणि खाजगीकरण फार वेगाने होत आहे याचा दृश्य परिणाम म्हणजे देशातील मोठ्या शहरात भव्य शॉपिंग मॉल , सुपर बाजार, पंचतारांकित हॉटेल्स, चकचकीत रस्ते, दिव्यांचा झगमगाट यामुळे शहरांचा चेहरामोहरा बदलून जात आहे. मात्र याउलट खेड्यात झोपडपट्ट्यात, आदिवासी भागात कमालीचे दारिद्र्य, भ्रष्टाचार, निरक्षरता, बेकारी, किमान शिक्षणा अभावी लाखो बालके, दारिद्र रेषेखाली असणाऱ्या लोकांची उपासमार, शेतकऱ्यांची आत्महत्या, स्त्रियांवर होणारे अत्याचार, एका बाजूला इंडिया शायनिंग तर दुसऱ्या बाजूला गुलामापेक्षा निकृस्ठ जीवन जगणारा समाज.

शिक्षण हे सामाजिक , आर्थिक, सांस्कृतिक, आणि राजकीय परिवर्तनाचे साधन आहे हे सर्वश्रुतच आहे. परंतु आजच्या शिक्षणक्षेत्रात बोटावर मोजणाऱ्या संस्था सोडल्या तर असे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देते काय ? देशातील मुठभर श्रीमंतांनी, राज्यकर्त्यांनी, उच्चपदस्थ लोकांनी आपल्या मुलांना हव्या तशा खाजगी, शाळा, महाविध्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था, व्यवस्थापन ,वैधकीय शिक्षण यासारख्या संस्था सुरु केल्या अशा संस्थेत गरिबांच्या मुलांना क्वचितच प्रवेश मिळतो उलट गरिबांच्या मुलांना जिल्हा परिषद, नगरपालिका, अशा कमकुवत शाळेमध्ये कमी खर्चात प्रवेश उपलब्ध आहेत. ह्या पारंपारिक संस्था निर्जीव झाल्याने त्यातून बाहेर पडणारा तरुण पदवी प्रमाणपत्राची रद्दी घेऊन दारोदारी फिरत

आहे. त्यांना नोकऱ्या मिळत नाही . थोर अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन भारताविषयी बोलतांना म्हणतात कि या "देशातील गरिबी व अज्ञान दूर व्हावयाचे असेल तर सर्वांना शिक्षणाची संजीवनी देण्याची नितांत गरज आहे. कारण या देशातील बहुसंख्येने असलेला दिन-दलित समाजाचे शिक्षण अगदी प्राचीन काळापासून आजपर्यंत दुर्लक्षित व उपेक्षित आहे" यावरून असे निदर्शनास येते कि, शिक्षणाच्या दृष्टीने सर्व जातीजमाती समान स्तरावर नाहीत. या ठिकाणी डॉ. बाबासाहेबांचे वाक्य फार मोलाचे वाटतात ते म्हणतात "शिक्षण हा सर्वात महत्वाचा भौतिक लाभ आहे याची मागासवर्गीयांना जाणीव झाली आहेत. त्यासाठी आम्ही कोणत्याही प्रकारच्या तीव्र संघर्षा साठी तयार आहोत. तसेच त्यासाठी आम्ही कोणत्याही भौतिक स्वरूपाचा त्याग करायला तयार आहोत. या संकृतीने उपलब्ध करून दिलेल्या प्रत्येक लाभाचा त्याग करावयाची आमची तयारी आहे. पण कोणत्याही परिस्थितीत उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी यांच्या महत्तम उपयोगाच्या हक्कांचा आम्ही त्याग करावयास तयार नाही" आता मागासवर्गांना जाणवले आहे कि शिक्षणाशिवाय त्यांचे अस्तित्वच सुरक्षित नाही आणि हेच वास्तव आहे.

आजच्या आधुनिक भारतात शिक्षण क्षेत्रात झालेले बदल आणि त्यांचे परिणाम आपल्या समोर आहे. आणि त्याद्वारे निर्माण होणाऱ्या समस्या सुद्धा आपणास माहित आहे याची वेळीच दाखल घेतली नाही , तर त्यात सुधारणा केली नाही तर शिक्षण हे एका विशिष्ट गटाची मक्तेदारी होऊन बसेल व त्याची झळ संपूर्ण समाजाला भेडसावेल आणि त्याचे परिणाम देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घटकांवर पडेल. म्हणून मी इथे सर्वांना समान न्याय मिळेल या दृष्टीने काही उपाय मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**शिफारशी :**

१) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बदलत्या अभ्यासक्रमात दलित,आदिवासी, मागासवर्ग यांचे प्रमाण कसे वाढेल यासाठी प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

२) शहरे आणि ग्रामीण विभाग यातील शैक्षणिक व्यवस्थेची दरी बुजविणे. ग्रामीण भागातील विध्यर्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी व सर्व सोयी उपलब्ध झाल्या पाहिजे.

३) प्राथमिक शिक्षण सक्तीचे बंधनकारक व परिसरातील शाळेतूनच झाले पाहिजे नाहीतर गरिबांचे मुले शाळेतच येणार नाही.

४) सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत खाजगी, अनुदानित, व सरकारी शाळा असे प्रकार दिसून येतात. त्या सर्व शाळा सरकारीच असल्या पाहिजे.

५) अभ्यासक्रमात व्यावसाईक विषयांचा समावेश करण्यात यावा त्यामुळे प्रत्येक व्यक्तीमागे किमान व्यावसाईक क्षमता व उद्योग करण्याची पात्रता निर्माण करावी.

६) सामाजिक व आर्थिक समता निर्माण करण्याचे योग्य शिक्षण देण्याची व्यस्था करावी.

७) अभ्यासक्रम निर्धारित करणे, अभ्यासक्रमासाठी पुस्तकांची निवड करणे ,परीक्षा घेणे हि कार्य करतांना विध्यार्थी – शिक्षक व आजचे वास्तविक जीवन जगण्यासाठी लागणारे कौशल्य याचा विध्यापिठाने आणि मानवसंसाधान मंत्रालयाने गंभीरतेने विचार करणे अवाश्यक आहे.

८) आज देशात खाजगी (विनाअनुदानित तत्वावर) आधारित हजारो संस्था कार्यरत आहे. त्यांच्या व्यापारीकरणावर नियंत्रण ठेवणे जेणेकरून समाजातील गरीब व मागास वर्गातील विध्यार्थ्यांना शिक्षण घेता येईल.

९) मागासवर्गीय विध्यार्थ्यांसाठी चांगल्या दर्जाची, सुविधायुक्त वसतिगृहाची निर्मिती करणे, वाढत्या महागाईच्या तुलनेत शिष्यवृत्ती वाढ करणे.

१०) शेवटची महत्वाची शिफारस म्हणजे केंद्र सरकारने शिक्षणावरील खर्चात उत्पन्नाच्या ६% पेक्षा वाढ करणे आवश्यक आहे. ज्यामुळे विध्यार्थ्यांना आणि शिक्षकांना संशोधनकार्यात मदत होईल.

**निष्कर्ष** :

वरील सविस्तर चर्चेवरून आपण खालील निष्कर्ष मांडू शकतो कि सध्याचे देशातील शैक्षणिक चित्र अत्यंत चिंताजनक आणि निराशाजनक दिसते. कारण प्रत्येक स्तरावर दिसणाऱ्या उणीवा, त्यातील अपयश, शिक्षणातील विषमता यामुळे एक प्रकारचे असमाधानाचे व अस्वस्थेचे चित्र

समाजाच्या सर्वच स्तरात दिसून येते. मागील दशकात शिक्षणाचा अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, शिक्षण-प्रशिक्षण, शिक्षकांची शैक्षणिक पात्रता यात बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत . मात्र शिक्षणाचा दर्जा सर्वसामान्य राहिलेला दिसतो. गुणवत्तापूर्ण शिक्षण संस्था वगळता अन्य शाळा , महाविद्यालये यांच्या भौतिक व शैक्षणिक सुविधांचा विचार करता गुणवत्ता हि दिवसेंदिवस घसरत आहे . आज गळतीचे प्रमाण ४०% पर्यंत पोहोचल्याचे दिसून येते. वरील सर्व बाबी व उणीवा ख-या असल्या तरी भारतीय शिक्षण व्यवस्थेचे महत्त्व कमी होत नाही कारण इतक्या मोठ्या भारत देशांत लाखो विध्यार्थ्यांना शिक्षण देणे ही तारेवरची कसरत आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही . येणारा काळ हा नक्कीच सुखद भरभराटीचा, महासत्तेचा असेल यात शंका नाही. तरी वरील मांडलेल्या उपाय योजनेचा शैक्षणिक धोरण सुधारणेसाठी उपयोगात आणल्या तर काहीना काही नक्कीच आपल्याला अभिप्रेत असलेल्या वास्तविक बदल नक्कीच दिसेल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) ग्रामीण विकासासाठी शिक्षण, डॉ. अरविंद रेडकर, शुभय प्रकाशन, मुंबई.

२) उध्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, डॉ.सुरेश करंदिकर, मीना मंगलकार, फडके प्रकाशन कोल्हापूर.

३) भारतीय शिक्षणातील मुलभूत समस्या, प्राचार्य डॉ. माळी, फडके प्रकाशन, कोल्हपुर.

४) दलितांचे शिक्षण, डॉ.भीमराव आंबेडकर, संपादन : प्रदीप, क्षितीज प्रकाशन, नागपूर.

५) शिक्षा का समाजशास्त्र, शारदा तिवारी, अर्जुन पब्लिकेशन हाउस, दिल्ली.

६) भारतीय शिक्षा का इतिहास, राकेश त्रिवेदी ओमेगा पब्लिकेशन, दिल्ली.

७) आधुनिक भारतीय समाज में शिक्षा, डॉ. सुरेंद्र कुमार शर्मा, डिस्कवरी पब्लिकेशन हाउस, दिल्ली.